## प्रकरण पहिले

## "माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर मिल्सचा ऐतिहासिक आणि सद्य:स्थितीचा अभ्यास"

# प्रकरण पहिले

## "माधवनगर कॉटन मिल्स् लि.माधवनगर" मिल्सचा

## ऐतिहासिक आणि सद्य:स्थितीचा

## अभ्यास

### १.१ माधवनगरचे भौगोलिक स्थान :

माधवनगर हे गांव महाराष्ट्र राज्यातील प्रगत सांगली जिल्ह्यात, मिरज तालुक्यात आहे, १६°४३′ ते १७°३८′ उत्तर अक्षांश आणि ७३°४१′ ते ७५°४१′ पूर्व रेखांशावर असलेल्या सांगलीच्या उत्तरेस ४.८२ कि.मी. अंतरावर (तीन मैल) माधवनगर हे गांव आहे. ते सांगली, कुपवाड, बुधगांव, कर्नाळच्या मध्यावर असलेले आहे. पुणे - मिरज दक्षिण मध्य रेल्वे मार्गावर हे गांव आहे. शिवाय ते सांगली शहराशी उत्तम प्रतीच्या डामरी रोडने जोडलेले आहे.

बारामती, फलटन, विटा, तासगांव या शहरांकडून सांगली, कोल्हापूर, मिरज कडे होणाऱ्या वाहतूकीचा मार्ग माधवनगरवरूनच जातो. सांगली - माधवनगर अशी शहर बस वाहतूक सेवा ५-१० मिनिटाच्या अंतराने सतत सुरू आहे. पूर्वी माधवनगर येथे असलेले रेल्वे स्टेशन आता सांगली येथे हलविले आहे. तरीही रेल्वे वाहतूकीचा लाभ घेणे माधवनगरकरांना फारसे अडचणीचे नाही. कारण अलिकडे सांगलीचा वाढता व्याप, माधवनगरची औद्योगिक प्रगती यामुळे माधवनगर सांगली शहराचाच एक भाग बनले आहे. त्यामुळे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेली वाहतूक सेवा माधवनगरला उपलब्ध आहे.

माधवनगर पासून औद्योगिक दृष्टया प्रगत असलेले कुपवाड २ कि.मी. अंतरावर आहे. कुपवाड औद्योगिक वसाहत, तिथे जवळच असलेली मिरज औद्योगिक वसाहत व सांगली औद्योगिक वसाहत मध्ये अनेक लघुउद्योग आहेत. उदा. तुंगालया, गोदरेज ॲग्रोवेट लि., मेनन पिस्टन इ. तसेच माधवनगर-पासून १-१।। कि.मी. अंतरावर वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि. सांगली हा मोठा उद्योग आहे. म्हणजेच औद्योगिकदृष्टया प्रगत भागात माधवनगरचा परिसर असल्याने औद्योगिक विकासाला पुरक परिस्थिती उपलब्ध आहे.

शैक्षणिक दृष्टया पाहिले तर माधवनगरला ३ मराठी प्राथमिक शाळा आणि सांगली शिक्षण संस्थेचे १ हायस्कूल आहे. बालवाडी, साक्षरता अभियान काम याद्वारेही शैक्षणिक संधी उपलब्ध करुन शैक्षणिक विकासास हातभार लावला जात आहे. शिवाय पूर्वी माधवनगर हे बुधगांवचाच एक भाग मानले जात होते. त्या बुधगांवमध्ये श्री. पद्मभूषण वसंतराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी हे टेक्निकल कॉलेज आहे. सांगली येथील वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, विलिंग्डन कॉलेज, चिंतामण कॉलेज या अगदी नावाजलेल्या शैक्षणिक संस्था आणि सांगलीतील इतर लहान-मोठ्या शैक्षणिक संस्था मधवनगर पासून अगदी जवळ असल्याने औद्योगिक विकासास आवश्यक ते शैक्षणिक वातावरण उपलब्ध आहे.

औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या इतर सुविधा उदा. बँक, पोस्ट, दळणवळण इ. उपलब्ध आहेतच, शिवाय जवळच सांगली हे जिल्हयाचे ठिकाण असल्याने इतर सुविधा सहज विकसित होत आहेत. बारमाही पाणी असणारी कृष्णा नदी सांगली जवळून वाहात असल्याने उद्योग उभारताना पाण्याची समस्या निर्माण होत नाही.

औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींच्या उपलब्धते-मुळे माधवनगरचा विकास वेगाने होत आहे.

१.२ माधवनगरची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मिरज संस्थानचे दुय्यम दर्जाचे संस्थान बुधगांव. बुधगांव संस्थानचे प्रमुख पटवर्धन यांच्या कुटुंबातील माधवराव पटवर्धन यांच्या नांवावरुन माधवनगर हे नांव पडलेले आहे. माधवनगरची मूळ जागा बुधगांव संस्थानच्या मालकीची होती. माधवराव पटवर्धन संस्थान प्रमुख असताना त्यांनी रेल्वे स्टेशन उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते. त्यामुळे १९३५ पूर्वी रेल्वे स्टेशन आणि काही इकडे-तिकडे विखुरलेली घरे होती. रेल्वे स्टेशनच्या सोयीमुळे हळू हळू वसाहत वाढू लागल्याने माधवराव पटवर्धनांच्या नांवावरुन त्या वसाहतीला "माधवनगर" हे नांव पडले.

बुधगांव संस्थानचे अलिकडील प्रमुख श्री बाबासाहेब पटवर्धन यांच्या प्रेरणे-तून माधवनगर येथे अनेक उद्योग, व्यापारी केंद्रे सुरु झाली. माधवनगर येथे उद्योग उभारणाऱ्यांना अल्प दरात जागा आणि कर सवलती देण्याचे बाबासाहेब पटवर्धनांनी जाहीर केल्याने अनेक ठिकाणाहून व्यापारी, उद्योजक आकर्षित झाले. माल वाहतूकीच्या दृष्टीने रेल्वे स्टेशनची सोय असल्याने वसईहून आलेल्या भगवानदास आत्माराम यांनी माधवनगर येथे कापूस जिनिंग मिल सुरु केली होती. १९४४ मध्ये लक्ष्मण नाथू, पुरशोत्तम दिवेकर, रामभाऊ भिडे यांनी पार्टनरशिपमध्ये माधवनगर कॉटन मिल सुरु केली. दालमल शेट, मालू यासारखे उद्योजकही तिथे आकर्षित झाले. हळू हळू माधवनगर येथे हातमाग व पॉवरलूमचे युनिट वाढू लागले.

वाढती वसाहत, वाढते उद्योग यामुळे माधवनगर येथे गावपातळीवर काही

समस्या निर्माण होऊ लागल्या. त्या सोडविण्यासाठी १९४८ - १९५३ पर्यंत माधवनगरला सॅनिटरी कमिटी स्थापन केली होती. भगवानदास आत्माराम (शहा प्रताप) हे तिचे पहिले अध्यक्ष होते. १ एप्रिल १९५४ ला माधवनगरला स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली. तिचे पहिले अध्यक्ष दिवेकर हणमान बक्षा मालू हे होते.

अलिकडे माधवनगर हे व्यापारी, विक्रेते, उद्योजक यांनी गजबजलेले शहर बनले आहे. कापड उद्योग हातमाग, पॉवरलूम, सिमेंट, तेल, सायझिंग असे विविध लहान-मोठे कारखाने येथे विकसित झाले आहेत. जकात कर चुकविण्यासाठी सांगलीच्या व्यापाऱ्यांची जवळ जवळ ६०-७० गोडाऊन्स माधवनगरला आहेत. माधवनगरला असलेले रेल्वे स्टेशन सांगलीला हलविले गेल्याने सध्या ३५ ते ४० ट्रान्सपोर्टस् माधवनगरला आहेत. त्यामुळे कारखानदारी, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँका अशा विविध विभागांचा विकास माधवनगरला होत आहे. सूत, सूती कापड, पॉलिस्टर कापड, सुटिंग - शर्टींग, प्रिन्टेट कापड धोती ओढण्या अशा विविध प्रकारच्या कापडांच्या विक्रीबाबत माधवनगरची बाजारपेठ देशी-विदेशी बाजारात प्रसिध्द आहे.

१.३ <u>माधवनगरची लोकसंख्या</u> :

औद्योगिक विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणून लोकसंख्येला महत्व आहे. लोकसंख्या वाढीमुळे उपभोग्य वस्तूंची मागणी वाढून उत्पादन वाढीस चालते मिळते. शिवाय उत्पादन वाढीस आवश्यक तो कामगार पुरवठा सहज, अल्प वेतनदरावर उपलब्ध होतो. त्यामुळे विकासाच्या प्रक्रियेला गती येते. अर्थात विशिष्ट मर्यादेपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल तर, अशी वाढती लोकसंख्या विकासात अडसर बनते. नव्याने वसलेल्या गांवची लोकसंख्या

जर वेगाने वाढत असेल तर त्या ठिकाणी विकासाची प्रक्रिया सुरु आहे. याची कल्पना येते.

रेल्वे स्टेशन मुळे निर्माण झालेली वसाहत वाढत जाऊन तिला माधवनगर हे नांव मिळाले. माधवनगरच्या औद्योगिक, व्यापारी विकासामुळे इतर ठिकाणाहून विकासाचा फायदा घेण्याच्या हेतूने येऊन स्थायिक होणारांची संख्या माधवनगरमध्ये सातत्याने वाढत आहे. त्यामुळे १९७१ च्या शिरगणतीपासून माधवनगरचा समावेश मिरज तालुक्यातील शहरी भागात केला आहे.

१.३.१

तक्ता क्र. १.१

माधवनगरची लोकसंख्या

| साल | | लोकसंख्या |
|---|---|---|
| १९५१ | - | ३,७६२ |
| १९६१ | - | ५,८११ |
| १९७१ | - | ८,८५३ |
| १९८१ | - | ११,१४४ |
| १९९१ | - | ११,८३४ |

District Census Handbook - Sangli District. 1981 & 1991

१९५१ पासून माधवनगरची लोकसंख्या सातत्याने वाढतच असल्याचे दिसते. १९५१ मध्ये ३,७६२ इतकी लोकसंख्या होती. ती १९६१ मध्ये ५,८११ झाली. १९७१ मध्ये ८,८५३ झाली. १९८१ मध्ये ११,१४४ झाली तर १९९१ मध्ये ११,८३४ झाली आहे. १९५१ ते १९९१ या ४० वर्षात माधवनगरची लोकसंख्या तीन पटीपेक्षा जास्त वाढली आहे.

१.३.२ माधवनगरच्या लोकसंख्येची लिंगभेदानुसार विभागणी :

तक्ता क्र. १.२

| साल | पुरुष | स्त्रिया | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९५१ | - | - | ३,७६२ |
| १९६१ | ३,१७१ | २,६४० | ५,८११ |
| १९७१ | ४,८३६ | ४,०१७ | ८,८५३ |
| १९८१ | ६,००५ | ५,१३९ | ११,१४४ |
| १९९१ | ६,२३० | ५,६०४ | ११,८३४ |

District census Handbook - Sangli District 1981 & 1991

माधवनगरच्या लोकसंख्येचे लिंगभेदानुसार वर्गीकरण पाहिले असता प्रत्येक वर्षी पुरुषांच्या प्रमाणापेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. १९६१ मध्ये एकूण लोकसंख्येत पुरुष ३,१७१ होते तर स्त्रिया २,६४० होत्या. १९७१ ला ४,८३६ पुरुष होते तर ४,०१७ स्त्रिया होत्या. १९८१ ला ६,००५ पुरुष होते तर ५,१३९ स्त्रिया होत्या. १९९१ ला ६,२३० पुरुष होते तर ५,६०४ स्त्रिया होत्या. प्रत्येक शिरगणतीमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.

१.३.३ माधवनगरची एकूण कामगार संख्या :

१.३.३ माधवनगरची एकूण कामगार संख्या :

तक्ता क्र. १.३

| साल | पुरुष कामगार | स्त्री कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|
| १९६१ | १,७२६ | २२९ | १,९५५ |
| १९७१ | २,५९१ | १२६ | २,७१७ |
| १९८१ | ३,१९८ | २४० | ३,४३८ |
| १९९१ | - | - | - |

District census Handbook - Sangli District 1981

माधवनगर हे शहर वाहतूक सुविधांनी युक्त आहे. सांगली, मिरज, कुपवाड इ. ठिकाणच्या उद्योगांचा विकास आणि माधवनगर मधील हातमाग, यंत्रमाग, कापड गिरणी, इतर छोटे-मोठे उद्योग, वाहतूक, दळणवळण, बँक इ. सेवा - सुविधांची उपलब्धता यामुळे माधवनगरला कामगार संख्या अधिक असली पाहिजे. वरील तक्त्यावरून माधवनगरची कामगार संख्या वाढत असल्याचे दिसते. मात्र एकूण लोकसंख्येशी तुलना करता, लोकसंख्या वाढीच्या तुलनेने कामगार संख्या फारशी वाढलेली नाही. १९६१ मध्ये कामगार संख्या १९५५ इतकी होती. १९८१ मध्ये ती ३,४३८ झाली. १९६१ ते १९८१ या २० वर्षाच्या कालात लोकसंख्या जवळ जवळ दुप्पट वाढली आहे. मात्र तितक्या कालावधीत कामगार संख्येत त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. स्त्री कामगार संख्येबाबत तर १९६१ ते १९८१ या २० वर्षात फक्त ११ कामगारांची वाढ झालेली दिसते. १९६१ ला स्त्री कामगार संख्या २२३ होती. ती १९८१ ला २४० झाली. २० वर्षात फक्त ११ स्त्री कामगार वाढले. ही बाब निराशाजनक व न पटणारी दिसते. १९६१ च्या तुलनेने १९७१ साली तर स्त्री कामगार संख्या

जवळ जवळ १०० ते १०५ नी घटलेलीच दिसते. १९७१ च्या तुलनेने १९८१ साली स्त्री कामगार संख्या वाढली असली तरी १९८१ साली एकूण लोकसंख्येत स्त्रीयांची संख्या ५,१३९ होती. त्यापैकी फक्त २४० स्त्रियांना काम मिळाले हे प्रमाण अगदी नगण्य आहे.

माधवनगरची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याप्रमाणात निवाऱ्याच्या सुविधा फारशा उपलब्ध नसल्याने माधवनगरला झोपडपट्टीचे प्रमाण वाढत आहे. माधवनगर झोपडपट्ट्या पुढील खास नावांनी ओळखल्या जातात. १) अहिल्यानगर झोपडपट्टी, २) राजगुरुनगर झोपडपट्टी, ३) गांधीनगर झोपडपट्टी, ४) वसंतनगर झोपडपट्टी, ५) जयभवानी नगर झोपडपट्टी, ६) मित्रमंडळ झोपडपट्टी, ७) शंकर पाटीलनगर झोपडपट्टी.

## १.४ माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगरची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

माधवनगर येथील "माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर" ही सांगली जिल्ह्यातील सर्वात मोठी संयुक्त कापड गिरणी आहे. माधवनगर हे सांगली, इचलकरंजी, कोल्हापूर, विटा येथील हातमाग व यंत्रमाग केंद्राच्या मध्यवर्ती आहे. सांगली जिल्ह्यात सध्या जवळ जवळ १ लाख पॉवरलूम आहेत. त्यामुळे कापड उद्योगाचा विकास वेगाने होत आहे.

१९३५ पूर्वी माधवनगर येथे फक्त रेल्वे स्टेशन आणि अल्पशी जुनी आणि इतस्तत: विखुरलेली वसाहत होती. अलिकडील बुधगांव संस्थानचे प्रमुख बाबासाहेब पटवर्धन यांनी उद्योजक, व्यापाऱ्यांना सवलतीच्या दराने जागा देण्यास, कर सवलती देण्यास सुरुवात केल्याने अनेक उद्योजक, व्यापारी तिथे आकर्षित झाले. आणि तेथे

उद्योगांचा विकास होऊ लागला. त्यापैकीच एक "माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर" ही कापड गिरणी होय.

बुधगांवचे राजा बाबासाहेब पटवर्धन यांच्या प्रेरणेने माधवनगर कॉटन मिल्सची स्थापना करण्याचे १९४२ मध्ये निश्चित करण्यात आले. सांगलीचे रामभाऊ भिडे, श्री. गंगाधर लक्ष्मण नाथू, श्री. पुरुषोत्तम कृष्णनाथ दिवेकर हे तिघे व त्यांच्या मित्रांनी कॉटन मिल स्थापन करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी २५ एकर जमिन खरेदी केली. कापड गिरणीच्या हेतूने स्पिनिंग विभागाचे बांधकाम, इंजिन विभागाचे बांधकाम, बॉयलर इमारत, मशीन दुरुस्ती गृह, कॅन्टीन इ. चे बांधकाम पूर्ण केले. खाजगी मालकीची कंपनी म्हणून "माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर" नावाची गिरणी भारतीय कंपनीज् ॲक्ट १९१३ च्या ७ व्या कलमानुसार स्थापन केली. या कायद्याचा स्वीकार मिरज (दुय्यम) संस्थानाने १ डिसेंबर १९३१ मध्ये केला. गिरणीत प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात हिंदूचा सण "अक्षयतृतीया" या दिवशी म्हणजेच २५ एप्रिल, १९४४ रोजी केली. प्रारंभी फक्त स्पिनिंग विभागच सुरू करण्यात आला होता.

१९४९-५० मध्ये रामभाऊ भिडे तर १९५४-५५ ला पुरुषोत्तम दिवेकर गिरणीच्या मालकी हक्कातून मुक्त झाले. त्यामुळे नाथू यांच्या मालकीची गिरणी झाली. १९५८ मध्ये गिरणीत कापड निर्मिती विभाग सुरू केला. तर १९५९ मध्ये कापडावर प्रक्रिया करणारा प्रक्रिया विभाग सुरु केला.

१९५६ च्या कंपनीज् ॲक्ट नुसार माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर या खाजगी मालकीच्या कंपनीचे "सार्वजनिक मर्यादित कंपनीत" रूपांतर करण्यात आले. तेंव्हापासून ही गिरणी सार्वजनिक मर्यादित कंपनी म्हणून कार्य करीत

आहे. १९७० मध्ये नाथू मॅनेजमेंटने ही गिरणी श्री. पी.एम्. जैन यांना विकली.

१.५ गिरणीची भांडवलाची स्थिती :

कोणताही उद्योग सुरू करण्यासाठी श्रम, भूमी, भांडवल, संयोजक या चार उत्पादन घटकांची गरज असते. यापैकी एक जरी घटक उपलब्ध नसेल तर उत्पादनाची प्रक्रिया चालू करता येत नाही. या चारही उत्पादन घटकांपैकी भांडवल हा उत्पादन प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक. उद्योगांची उभारणी, उत्पादन प्रक्रिया, कच्चा माल, कामगार, वाहतूक, दळणवळण, आधुनिकीकरण या विविध अंगासाठी भांडवलाची गरज असते.

१.५.१ माधवनगर कॉटन मिल्सची स्थिर भांडवलाची स्थिती -

तक्ता क्र. १.४

अधिकृत भांडवल

| साल | | अधिकृत भांडवल [रु.] |
|---|---|---|
| १९४८ | - | २५,००,००० |
| १९६१ | - | ७५,००,००० |
| १९८८ | - | १,५०,००,००० |
| १९९२ | - | ५,००,००,००० |

(वार्षिक अहवाल १९८४ ते १९९२ आणि वित्त राजिस्टर)

गिरणी स्थापन झाली तेव्हा अधिकृत भांडवल २५ लाख रुपये निश्चित केले होते. हे भांडवल २५०/- रु. दराने १०,००० शेअर्स विक्रीस काढून उभारले जाणार होते. १९६१ मध्ये अधिकृत भांडवल वाढविण्यात आले. ते ७५ लाख रु. निश्चित केले. हे भांडवल उभे करण्यास शेअर्सचा दर २५०/- रु. इतका १९६३ पर्यंत तसाच होता. मात्र १९६३ नंतर शेअर्सचा दर ५०/- रु. करण्यात आला. १९८८ मध्ये पुन्हा अधिकृत भांडवल मर्यादा १।। कोटी रुपयांपर्यंत वाढविली. ६.६.१९९२ पासून ही मर्यादा ५ कोटी रु. करण्यात आली आणि तेव्हापासून शेअर्सचा दरही १०/- रु. प्रति शेअर्स असा निश्चित करण्यात आला.

माधवनगर मिलचे वसूल झालेले भांडवल -

तक्ता क्र.१.५

| साल | | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १९७१ | - | २५,५२,००० |
| १९७५ | - | २८,५८,४०० |
| १९७९ | - | २९,५९,६८५ |
| १९८४ | - | ४५,४७,११० |
| १९८९ | - | ६१,९८,३५० |
| १९९० | - | ६५,१०,८५० |
| १९९१ | - | ७३,०५,८५० |
| १९९२ | - | ७३,०५,८५० |
| १९९३ | - | १,३५,००,००० |

( वार्षिक अहवाल आणि वित्तविभागातील रजिस्टर )

माधवनगर कॉटन मिल्सचे अधिकृत भांडवल १९८८ पर्यंत ७५ लाख रुपये होते. तेव्हा १९७१ मध्ये २५ लाख ५२ हजार रुपये वसूल भांडवल होते. १९८८ मध्ये अधिकृत भांडवल मर्यादा १ ।। कोटी रु. निश्चित केली ती १९९२ पर्यंत होती. तेव्हा १९९२ मध्ये वसूल भांडवल ७३ लाख ५ हजार ८५० होते. १९९२ मध्ये पुन्हा अधिकृत भांडवल ५ कोटी रुपये केले तेव्हा शेअर्सचा दर ही कमी करून १०/- रु. निश्चित केला तेव्हा वसूल भांडवल १९९३ मध्ये १ कोटी ३५ लाख रु. इतके होते. म्हणजेच कंपनीच्या वसूल भांडवलाची स्थिती सातत्याने चांगली राहिल्याचे दिसते.

## १.५.२ गिरणीतील खेळते भांडवल :

कोणत्याही उद्योगाला स्थिर भांडवलाबरोबरच बदलत्या अगर खेळत्या भांडवलाची गरज असते. उद्योगाचे उत्पादन कार्य सुरळीत चालू ठेवण्याच्या दृष्टीने कच्चा माल, वाहतूक, दळणवळण, कर्मचाऱ्यांचा पगार, कामगार कल्याण अशा विविध कारणांसाठी खेळते भांडवल आवश्यक असते. सदर गिरणीच्या खेळत्या भांडवलात गिरणीची शिल्लक आणि वाढावा, कर्ज, या भांडवल सुविधामध्ये कर्जाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. भांडवल उभारण्याचा एक मार्ग म्हणजे कर्ज. सदर गिरणीत हा मार्ग धोकादायक बनला आहे. भारतीय औद्योगिक पुनर्रचना बँक (आयडीबीआय), भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ, (आयएफसीआय), भारतीय औद्योगिक विकास बँक (आयडीबीआय), भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ (आयसीआयसीआय) यासारख्या वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जात आणि बँक कर्जात सातत्याने वाढ होत आहे.

बँका आणि वित्त संस्थांकडील कर्जे :

तक्ता क्र. १.६

| साल | | कर्जाची रक्कम [रु.] |
|---|---|---|
| १९८५ | - | १०,८९,७१,६२३ |
| १९८६ | - | १३,१०,२०,४८१ |
| १९८७ | - | १६,१३,७४,२५७ |
| १९८८ | - | १७,८५,७८,६६२ |
| १९८९ | - | १९,७४,४६,१९८ |
| १९९० | - | २३,६३,१५,४२५ |
| १९९१ | - | २७,३१,११,७७४ |
| १९९२ | - | २९,२२,२९,३८८ |

(वार्षिक अहवाल - १९८५-८६ ते १९९१-९२)

सदर गिरणीच्या बँका आणि वित्त संस्थाकडील कर्जाऊ भांडवलात सातत्याने प्रचंड वाढ होत गेल्याचे दिसते. १९८५ मध्ये १०,८९,७१,६२३ कोटी रु. कर्जाची रक्कम १९९२ मध्ये २९,२२,२९,३८८ पर्यंत गेली आहे. याशिवाय इतर उचल, ठेवी याद्वारे उभे केलेले भांडवल वेगळेच आहे.

गिरणीच्या भांडवलात कर्जाचा वाढता हिस्सा हा धोक्याची पातळी दर्शवितो.

१.६ गिरणीचे संचालक मंडळ :

२५ एप्रिल, १९४४ रोजी सुरु झालेली कापड गिरणी ही खाजगी

मालकीची पार्टनरशिप मध्ये होती. श्री. गंगाधर लक्ष्मण नाथू, रामभाऊ भिडे, श्री. पुरुषोत्तम दिवेकर, मनोहरलाल द्वारकादास मेहता, व्ही.एम्. साठे व इतर काही जण पार्टनर होते. गिरणीत उत्पादनाला प्रारंभ झाला तेव्हा मॅनेजिंग एजंटस् पध्दत अस्तित्वात होती. तेव्हा मॅनेजिंग एजंटस् - गंगाधर लक्ष्मण नाथू ॲण्ड सन्स प्रायव्हेट लि.

बोर्डाचे सदस्य - १) गंगाधर नाथू
२) मनोहरलाल मेहता
३) जे.जे. मेहता
४) व्ही.एम्. मेहता
५) एम्.जी. नाथू
६) एस्.जी. नाथू

३ एप्रिल, १९७० ला मॅनेजिंग एजन्सी पध्दत बंद झाली. तिथून पुढे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स पध्दत सुरु झाली. आणि कंपनीचा कारभार मॅनेजिंग डायरेक्टरच्या नियंत्रणाखाली सुरु झाला. पहिले मॅनेजिंग डायरेक्टर एस्.एम्. जैन हे होते. १९७० ते १९७८-७९ पर्यंत पी.एम्. जैन हे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर अशा संयुक्त जबाबदाऱ्या पार पाडीत होते. सध्या पी. एम्. जैन चेअरमन आहेत, एस्.एम्. जैन मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

<u>सध्याचे संचालक मंडळ -</u>

श्री पी.एम्. जैन - चेअरमन
श्री आर्.आर. कुमार
" आर.जे. झवेरी
" एस्. राजेंद्रन्
" एस्.आर. सुब्बारामन - बी.आय्.एफ्.आर. चा स्वतंत्र संचालक

श्री. यु.एम्. काळे - आय.डी.बी.आय. चा प्रतिनिधी


" पी.ए. चितळे

" एस्.जी.वैद्य - महाराष्ट्र सरकारचा प्रतिनिधी

" टी. एम्. गोपालस्वामी

" एस्.एम्. जैन - मॅनेजिंग डायरेक्टर

# व्यवस्थापकीय रचना



## १.८ माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर गिरणीच्या उत्पादनाचे स्वरूप :

भूमी, श्रम, भांडवल, संयोजक या चार उत्पादन घटकांना एकत्र करून कार्यप्रवण करून उत्पादन निर्मितीच्या प्रक्रियेला प्रारंभ केला जातो. आणि उत्पादन वाढीला गती देता येते. कोणताही खाजगी क्षेत्रातील उद्योग नफा प्राप्तीच्या हेतूने उत्पादन कार्य करीत असतो. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगा-पुढे मात्र नफ्याऐवजी सामाजिक हीत साध्य करणे हा दृष्टीकोन असतो.

खाजगी क्षेत्रातील, भागीदारीतील उद्योगात जास्तीत जास्त नफा प्राप्तीच्या हेतूने विविध प्रकारचे प्रयत्न केले जातात. भांडवलाचे प्रमाण वाढवून उद्योगाचा आकार वाढविणे, उद्योगाचे आधुनिक्किरण करणे, उत्पा-दनाचे स्वरूप बदलणे, उत्पादनाची रचना बदलणे अशा प्रकारच्या प्रयत्नातून उत्पादन वाढविण्याचा, नफा अधिकाधिक मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

"माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर" ही गिरणी २५ एप्रिल, १९४४ रोजी सुरू झाली. तेव्हा फक्त सूत निर्मिती विभाग (स्पिनिंग विभाग) सुरू करण्यात आलेला होता. १९५८ मध्ये गिरणीत कापड निर्मिती विभाग (विव्हिंग विभाग) सुरू करून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला. लगेचच १९५९ मध्ये कापडावर प्रक्रिया करणारा प्रक्रिया विभाग (प्रोसेसिंग विभाग) सुरू करण्यात आला. स्पिनिंग, विव्हिंग, प्रोसेसिंग हे तिन्ही विभाग सुरू असल्याने या गिरणीला संयुक्त गिरणी संबोधले जाते. टप्प्या टप्प्याने गिरणीत तिन्ही विभाग सुरू केल्याने गिरणीतील भांडवल प्रमाण वाढले, कामगार संख्या वाढली आणि गिरणीच्या एकूण आकार रचनेत वाढ झाली.

माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना गिरणीत प्रत्यक्षात चालू असलेल्या उत्पादन कार्याची माहिती घेणे गरजेचे ठरते.

माधवनगर कॉटन मिलमध्ये १) सूत निर्मिती, २) कापड निर्मिती, ३) कापडावर प्रक्रिया करणे या तिन्ही विभागात उत्पादन कार्य सुरु आहे. या तिन्ही विभागात सूत, सूती कापड, पॉलिस्टर कापड, कॉटन, सुटिंग-शर्टींग, बेडशीट, ओढण्या, साड्या, ड्रेस, मटेरियल अशा विविध प्रकारच्या कापडाचे, सूत निर्मितीचे उत्पादन केले जाते. उत्पादनाची प्रत्यक्ष प्रक्रिया खालील विविध टप्प्यातून केली जाते.

१) सूत निर्मिती :

२५ एप्रिल, १९४४ साली गिरणीत उत्पादन कार्याला सुरुवात झाली तेव्हा प्रथम फक्त हा सूत निर्मिती विभाग सुरु होता. सध्या या विभागात कापूस व इतर कच्चा मालापासून साधे (कॉटन) सूत आणि सिंथेटिक सूत निर्माण करण्याची प्रक्रिया चालते. ही प्रक्रिया ब्लोरुम, कार्डिंग, ड्रॉईंग, कोंबर, स्पीड फ्रेम, रिंग फ्रेम, वाईडिंग अशा विविध विभागात चालू असते. कापसापासून तयार केलेले सूत आणि सिंथेटिक सूत सर्वच्या सर्व गिरणीतच वापरले जात नाही. काही सूत विकले जाते आणि काही कापड तयार करण्यासाठी गिरणीतच वापरले जाते.

तयार सूत गिरणीतच कापड निर्मितीच्या पुढील प्रक्रियेसाठी वापरावयाचे असल्यास ते वार्पिंग विभागाकडे पाठविले जाते. वार्पिंग विभागात वाईडिंग कडून आलेले कोन्स् बीमावर भरले जातात. पुढे सायझिंग विभागात

सूताला ताकद येण्यासाठी सायझिंग मशीनमध्ये खळ (कांजी) तयार करुन त्यामधून पास केले जाते व खळयुक्त बीम तयार केले जातात.

२) कापड निर्मिती :

सायझिंग विभागाकडून आलेले खळयुक्त बीम लूम्सवर चढवून कापड तयार केले जाते. पूर्वी या गिरणीत कापड निर्मितीसाठी साधे अगर स्वयंचलित माग वापरले जात होते. सध्या हे उत्पादन एअरजेट लूम्सवर केले जाते. सध्या साधे अगर स्वयंचलित लूम्स् नाहीतच. १६२ एअरजेट लूम्सवर कापड निर्मितीचे कार्य चालते.

३) कापडावर प्रक्रिया करणे :

कापड निर्मिती विभागाकडून आलेले कापड फिकट करडया रंगाचे असते. प्रक्रिया विभागात प्रथम ब्लीचींग (कापड धुण्याची प्रक्रिया) केले जाते. ब्लीचींग युक्त कापडावर नंतर फिनिशिंग केले जाते. आणि नंतर त्या कापडावर कापड रंगविण्याची म्हणजेच डाईंगची क्रिया केली जाते.

वरील प्रक्रियेनंतर कापडावरती प्रिंटींग खात्यात रोटरी स्क्रिन प्रिंटींग मशीनवर डिझाईन्स उठवून डिझाईन युक्त कापड वेगवेगळया ७-८ रंगात तयार केले जाते. पुढे फोल्डिंग खात्यात तयार कापड मीटर्समध्ये मोजून बेल्समध्ये पॅक केले जाते.

१.९ गिरणीतील प्रत्यक्ष उत्पादन :

२५ एप्रिल, १९४४ पासून गिरणीत प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात झाली. प्रथम फक्त स्पिनिंग विभागात (सूत निर्मिती) उत्पादन सुरु होते. १९५८ मध्ये

सूतापासून कापड निर्माण करणारा विव्हिंग विभाग सुरू करण्यात आला. तर लगेचच १९५९ मध्ये तयार कापडावर प्रक्रिया करणारा प्रोसेसिंग विभाग सुरू करण्यात आला. त्यामुळे गिरणीतील उत्पादन प्रमाण वाढत गेले. १९८० नंतर गिरणीत आधुनिकीकरणावर भर दिला. साध्या मागांऐवजी स्वयंचलित यंत्र माग, नंतर एअरजेट लूम्स्, आटो कोनर, वार्पींग मधील नवीन मशीन अशा आधुनिक यंत्रांचा अवलंब केला जात आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाचे स्वतंत्र उत्पादन आणि गिरणीचे एकूण उत्पादन वाढत असल्याचे दिसते. त्यामुळे गिरणीची उत्पादनक्षमता ही वाढत आहे. प्रथम गिरणीची उत्पादन क्षमता ५००० स्पिंडल इतकी होती. ती सध्या ३३,००० स्पिंडल इतकी झाली आहे. गिरणीची १९८४-८५ नंतरची विभागानुसार उत्पादन स्थिती पुढील प्रमाणे -

१.९.१ (१) स्पिनिंग विभाग ( सूत निर्मिती ) उत्पादन -

१९४४ पासून हा विभाग गिरणीत सुरु असल्याने, तसा तो खूप जुना विभाग आहे. या विभागाचे १९८४-८५ पासून १९९२-९३ पर्यंतचे उत्पादन प्रमाण पुढील प्रमाणे -

तक्ता क्र. १.७

| वर्ष | | सूत उत्पादन (किलो) |
|---|---|---|
| १९८४-८५ | - | २१,११,७७४ |
| १९८५-८६ | - | २३,७८,९८६ |
| १९८६-८७ | - | २२,७२,२३३ |
| १९८७-८८ | - | २०,१४,३९१ |
| १९८८-८९ | - | १८,५८,७१२ |
| १९८९-९० | - | २५,१८,७३४ |
| १९९०-९१ | - | २९,०२,५६० |
| १९९१-९२ | - | २५,५४,१५७ |
| १९९२-९३ | - | १७,२१,१७६ |

मिल्समधील सांख्यिकी विभाग

१९८४-८५ पासून उत्पादन वाढ होत असल्याचे दिसते. मात्र १९८७-८८, १९८८-८९ आणि आता १९९२-९३ या वर्षात उत्पादनात घट झालेली दिसते. भारतात १९८२ ते १९८७-८८ पर्यंत कापड उद्योग धोक्यात होता. त्याची झळ या गिरणीतील उत्पादनाला पोहचल्याचे दिसते. १९८९ नंतर स्थिती बदलली. उत्पादनात प्रचंड वाढ होत गेली. पुन्हा १९९२-९३ मध्ये गिरणीचे उत्पादन फारच घटल्याचे दिसते. कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ, वीजदरात झालेली वाढ, कच्च्या मालाच्या खरेदीतील इतर अडचणी, शिवाय आधु-निकीकरणाच्या प्रचंड गुंतवणूकीमुळे कर्जात झालेली वाढ, व्याजदराच्या भरमसाठ रकमा यामुळे आर्थिक अडचण तीव्र बनली. त्यामुळे कच्चा माल खरेदी करण्यात अडथळे आले आणि काही वर्षे उत्पादन घटले.

१.९.२ (२) विव्हिंग विभाग (कापड निर्मिती विभाग) उत्पादन -

स्पिनिंग विभागात निर्माण केलेले सर्वच सूत विव्हिंग विभागात वापरले जात नाही. त्यातील काही सूत विक्ले जाते आणि काही कापड निर्मितीसाठी वापरले जाते. त्यामुळे गिरणीतील हा विभाग स्वतंत्र मानला जातो. १९५८ पासून गिरणीत हा विभाग सुरु करण्यात आला आहे. १९८४-८५ ते १९९२-९३ या कालातील या विभागातील उत्पादन पुढील प्रमाणे -

तक्ता क्र.१.८

विव्हिंग विभागातील उत्पादन (मीटर)

| वर्ष | | कापड उत्पादन (मी.) |
|---|---|---|
| १९८४-८५ | - | २७,२७,७७८ |
| १९८५-८६ | - | २२,१३,३९५ |
| १९८६-८७ | - | ३८,६४,४८० |
| १९८७-८८ | - | ४१,९३,२३७ |
| १९८८-८९ | - | ३७,०७,३९९ |
| १९८९-९० | - | ४७,३९,१४२ |
| १९९०-९१ | - | ५९,२१,५६४ |
| १९९१-९२ | - | ४२,१५,९२४ |
| १९९२-९३ | - | ३६,२२,३६६ |

माधवनगर कॉटन मिल सांख्यिकी विभाग माधवनगर

या विभागात पूर्वी कापड निर्मितीसाठी साधे माग वापरले जात होते. १९८०-८१ ला स्वयंचलित माग वापरण्यास सुरुवात झाली. १९८८ ला तर या विभागाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने एअरजेट लूम बसविण्यात आले आहेत. सध्या या विभागात इतर कोणतेही लूम नाहीत. फक्त १६६ एअरजेट लूम आहेत. पैकी १६२ लूम चालू आहेत. त्यामुळे या विभागात १९८८ नंतर उत्पादन वाढत गेल्याचे दिसते. मात्र १९९१-९२ आणि १९९२-९३ या वर्षी उत्पादनात वाढ होण्याऐवजी घट झाल्याचे दिसते. कारण कच्च्या मालाच्या दरात वाढ, वाढते कर, वीजदरात वाढ, यामुळे उत्पादन खर्च वाढू लागला. आधुनिकीकरणासाठी काढलेल्या प्रचंड कर्जामुळे त्यावरील व्याजाच्या भरमसाठ रक्कमांमुळे पुरेसा कच्चा माल खरेदी करणे शक्य न झाल्याने, ट्रक वाहतूकीचा दीर्घकालीन संप यामुळे कच्चा माल वेळेवर उपलब्ध न झाल्याने दोन वर्षात उत्पादनात घट झाल्याचे दिसते. त्याशिवाय आखाती प्रदेशात असलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे कापडाची इतर देशांकडील मागणी बरीच कमी झाल्याने उत्पादनात घट झाल्याचे दिसते.

## प्रति लूम उत्पादकता (मी.)

कापड निर्मिती विभागात (विव्हिंग) लूम (माग) द्वारे कापड निर्मिती केली जाते. या गिरणीत प्रथम साधे माग वापरले जात होते. १९८०-८१ नंतर स्वयंचलित माग वापरले आणि आता १९८८ पासून फक्त एअरजेट लूम द्वारे कापड निर्मिती केली जाते. माधवनगर कॉटन मिलमधील लूमची सरासरी उत्पादकता पुढील प्रमाणे

तक्ता क्र.१.९

| वर्ष | | प्रतिलूम उत्पादकता (मी.) |
|---|---|---|
| १९८४-८५ | - | १६.८२ |
| १९८५-८६ | - | १८.५२ |
| १९८६-८७ | - | २१.५५ |
| १९८७-८८ | - | २७.७० |
| १९८८-८९ | - | २७.४२ |
| १९८९-९० | - | २९.३३ |
| १९९०-९१ | - | ३६.५४ |
| १९९१-९२ | - | ३४.९६ |
| १९९२-९३ | - | ४०.१० |

माधवनगर कॉटन मिल सांख्यिकी विभाग माधवनगर

१९८४-८५ पासून गिरणीतील प्रतिलूम उत्पादकता सातत्याने वाढत असल्याचे दिसते. १९८८ नंतर गिरणीत विव्हिंग विभागात एअरजेट लूम बसवून आधुनिकीकरणास प्रारंभ केला तेव्हापासून तर प्रतिलूम उत्पादकता वेगाने वाढत गेल्याचे दिसते. १९८४-८५ मध्ये स्वयंचलित माग असताना प्रति-लूम उत्पादकता १६.६२ मीटर होती. ती १९८८ पर्यंत वाढतच होती. परंतु १९८८ नंतर अधिक वेगाने वाढल्याचे दिसते. १९९२-९३ मध्ये ती ४०.१० मीटर इतकी झाली. म्हणजेच १९८४ च्या तुलनेने १९९२-९३ मध्ये प्रतिलूम उत्पादकता जवळ जवळ २।। पटीने वाढल्याची दिसते.

१.९.३ (३) प्रोसेसिंग विभाग - (प्रक्रिया विभाग)

१९५९ सालापासून गिरणीत प्रोसेसिंग विभाग सुरु करण्यात आला. विव्हिंग विभागाकडून आलेले कापड फिकट करड्या रंगाचे असते. अशा

कापडावर प्रक्रिया करुन त्याला अंतिम स्वरुप दिले जाते. त्यासाठी ब्लिचींग, फिनिशींग, डाईंग या प्रक्रिया कराव्या लागतात. त्यानंतर तयार झालेल्या कापडावर डिझाईन प्रिंट करण्याचे काम प्रिंटींग विभागाकडून केले जाते. १९८४-८५ पासून १९९२-९३ पर्यंत या विभागात प्रमाणात उत्पादन प्रक्रिया झाली.

प्रोसेसिंग विभागातील उत्पादन

तक्ता क्र. १.१०

| वर्ष | | उत्पादन (मीटर) |
|---|---|---|
| १९८४-८५ | - | १,४५,८६,१३६ |
| १९८५-८६ | - | १,६६,६२,८०६ |
| १९८६-८७ | - | १,५८,८६,६८५ |
| १९८७-८८ | - | १,३९,५५,४७१ |
| १९८८-८९ | - | १,०२,८९,२२५ |
| १९८९-९० | - | १,५५,४७,७१० |
| १९९०-९१ | - | १,६८,५४,००४ |
| १९९१-९२ | - | १,५५,०८,०५४ |
| १९९२-९३ | - | १,२२,८३,६६४ |

माधवनगर कॉटन मिल सांख्यिकी विभाग माधवनगर.

प्रोसेसिंग विभागात तयार कापडावर प्रक्रिया करुन कापडाला अंतिम रुप दिले जाते. माधवनगर कॉटन मिलमधील या विभागाचे उत्पादन १९८८-८९ आणि १९९२-९३ ही दोन वर्षे वगळता इतर वर्षी स्थिर अगर काही प्रमाणात

वाढते असल्याचे दिसते. १९८८-८९ या वर्षापासून माधवनगर कॉटन मिल आजारी उद्योग या सदरात मोडते. १९८८-८९, १९९२-९३ या कालावधीत गिरणीतील विव्हिंग, स्पिनिंग विभागातील उत्पादनही घटल्याचे दिसते. त्याचा परिणाम या प्रोसेसिंग विभागावर झाल्याचा दिसतो. शिवाय आखाती युध्दामुळे कापडाच्या मागणीत झालेल्या घटीमुळेही या विभागातील उत्पादनात घट झाल्याचे दिसते.

१.१० विक्रीची पध्दत :

माधवनगर कॉटन मिल ही गिरणी सूत निर्मिती, कापड निर्मिती आणि कापडावर प्रक्रिया करणे या तिन्ही विभागात उत्पादन करते. उत्पादन प्रक्रियेत सातत्याने आधुनिकीकरणाचा अवलंब केला जात असल्याने तयार मालाचा दर्जा श्रेष्ठ प्रतीचा आहे. या गिरणीत सूत, सूती कापड, सुटिंग, शर्टिंग, बेडशीट, ओढण्या, १०० टक्के पॉलिस्टर कापड, साडया रेडिमेंट कपडे अशा वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन केले जाते. उत्पादित मालाची विक्री (१) देशांतर्गत बाजारपेठेत आणि (२) विदेशी बाजारपेठेत केली जाते.

१) देशांतर्गत बाजारपेठेत विक्री -

(अ) सूत विक्री -

सूत विक्री, एजंटद्वारे केली जाते. इचलकरंजी, भिवंडी, गोवा या ठिकाणी कॉटन, सिंथेटिक, पॉलिस्टर सूत विक्री केली जाते.

(ब) कापड विक्री -

तयार कापड विक्रीचा डेपो इचलकरंजी येथे आहे. त्याचे मुख्य ऑफिस

मुंबई येथे आहे. तर रेडिमेंट कापड विक्री डेपो बंगलोरला आहे.

इचलकरंजी, दिल्ली, कर्नाटक, तामिळनाडू येथे तयार कापडाची विक्री मोठया प्रमाणावर होते. या गिरणीत तयार होणाऱ्या मालाची किरकोळ विक्री कमी प्रमाणात होते. माधवनगर आणि कोल्हापूर या दोनच ठिकाणी किरकोळ विक्रीची दोन दुकाने आहेत. घाऊक विक्रीत काही वेळा व्यापारी लोक तयार माल खरेदी करतात. परंतु बऱ्याचदा अगोदर नमुना पाठवून ऑर्डर देतात. त्याप्रमाणे माल तयार करून पाठविला जातो.

(२) <u>विदेशी बाजारपेठेत विक्री</u> -

माधवनगर कॉटन मिलमध्ये तयार होणाऱ्या मालाची विक्री अधिक प्रमाणात निर्यातीच्या मार्गाने होते.

अ) <u>सूत विक्री</u> -

गिरणीत तयार होणाऱ्या सूताला इटली, जर्मनी या देशांकडून अधिक मागणी आहे. जपान, हॉंगकॉंग या देशांकडून काही प्रमाणात मागणी आहे.

ब) <u>कापड विक्री</u> -

तयार कापडाला मोठया प्रमाणात गल्फ कंट्री (इराण, इराक, सौदी अरेबिया) इस्त्राईल, रशिया, अमेरिका या देशांकडून अधिक मागणी आहे.

निर्यात केला जाणारा माल एजंट मार्फत पाठविला जातो. प्रत्यक्ष निर्यात केली जात नाही.

## १.११ माधवनगर कॉटन मिलमधील कामगार संख्या :

श्रम, भूमी, भांडवल, संयोजक या चार उत्पादन घटकांच्या सहकार्याने उत्पादनाचे कार्य सुरु होते. या चार उत्पादन घटकांपैकी श्रमिक अगर कामगार हा एकच उत्पादन घटक उत्पादन कार्यात सक्रिय सहभागी होत असतो. त्यामुळे इतर उत्पादन घटकात कामगाराला अधिक महत्व प्राप्त होते. भारत हा अतिरिक्त लोकसंख्येचा देश आहे. त्यामुळे अधिकाधिक लोकांना रोजगार देणारा व्यवसाय भारतात महत्त्वाचा मानली जातो. शेती खालोखाल औद्योगिक क्षेत्रात कापड उद्योगात अधिकाधिक रोजगार उपलब्ध होतो.

माधवनगर कॉटन मिल ही सांगली जिल्ह्यातील जुनी आणि मोठी संयुक्त गिरणी आहे. गिरणी स्थापन झाली तेंव्हा २०० कामगार काम करीत होते. ही कामगार संख्या सातत्याने वाढत गेली. जुलै, १९९३ अखेर कामगार संख्या १५५३ इतकी झाली आहे. सूत निर्मिती, कापड निर्मिती, प्रक्रिया करणे, इंजिन विभाग, जनरल या सर्व विभागात मिळून १५५३ कामगार आहेत. याशिवाय ऑफिस स्टाफ मधील एकूण संख्या २५२ इतकी आहे. सदर संशोधनाचा विषय प्रत्यक्ष कामगारांशी संबंधित आहे. त्यामुळे कामगार संख्येतील बदल अभ्यासणे गरजेचे ठरते. त्यासाठी डिसेंबर १९८५ पासून जुलै १९९३ अखेर कामगार संख्येत झालेले बदल अभ्यासाच्या दृष्टीने विचारात घेतले. कामगार संख्येतील बदल पुढीलप्रमाणे -

12566
A

तक्ता क्र. १.११

१.१०.१ माधवनगर कॉटन मिल मधील कामगार संख्येतील बदल

| वर्ष | | कायम कामगार | बदली कामगार | शिकावू कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर, | १९८५ | १३५९ | ४३७ | १० | १८०६ |
| " | १९८६ | १३३२ | ३९६ | १३ | १७४१ |
| " | १९८७ | १२९० | ४१७ | ८७ | १७९४ |
| " | १९८८ | १२७० | ४३० | २९ | १७२९ |
| " | १९८९ | १२४२ | ४२४ | १६ | १६७९ |
| " | १९९० | १३५१ | २७३ | १०३ | १७२७ |
| " | १९९१ | १३३३ | २७८ | १३२ | १७४३ |
| " | १९९२ | १२१८ | ३८५ | ८ | १६११ |
| जुलै, | १९९३ | ११३२ | ३८२ | ८ | १५२३ |

माधवनगर कॉटन मिल लेबर ऑफिस – माधवनगर

माधवनगर कॉटन मिल मधील कामगार संख्या प्रारंभी फक्त २०० होती. ती सातत्याने वाढत गेली असल्याने रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने ही मिल महत्त्वाची ठरते. जुलै, १९९३ अखेर या गिरणीत १५२३ कामगार आणि २५२ ऑफिस स्टाप मिळून १७७५ लोकांना रोजगार प्राप्त झालेला होता. कामगार संख्या वाढलेली असली तरी डिसेंबर १९८५ साली १८०६ कामगारांना कामगारांना रोजगार मिळालेला होता ते प्रमाण दिवसेंदिवस घटत असल्याचे दिसते. इतर वर्षातील कामगार संख्येपेक्षा जुलै, १९९३ मधील कामगार संख्या अधिकच घटलेली दिसते. डिसेंबर, १९८५ मध्ये कामगार संख्या १८०६ होती.

ती जुलै, १९९३ मध्ये १५५३ झाली म्हणजेच कामगारांच्या संख्येत २०० ते २५० कामगारांची घट झाली आहे.

गिरणीतील बदली कामगार संख्येत फारसा बदल डिसेंबर, १९८९ पर्यंत झालेला नाही. मात्र डिसेंबर, १९९०, डिसेंबर १९९१ या दोन वर्षात बदली कामगार संख्या घटली आहे. पुन्हा डिसेंबर १९९२ मध्ये बदली कामगार संख्या वाढल्याचे दिसते. शिकावू कामगार संख्या कमी-जास्त झाली असल्याचे दिसते. मात्र जेव्हा डिसेंबर १९९०-९१ मध्ये बदली कामगार संख्या घटली तेव्हा शिकावू कामगार संख्या एकदमच वाढली. १९८५ मध्ये शिकावू कामगार १० होते. ते १९९१ मध्ये १३२ झाले. मात्र पुन्हा ती संख्या ८ पर्यंत घसरली.

१९८०-८१ नंतर गिरणीत आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ झालेला आहे. साध्या मागांऐवजी स्वयंचलित माग वापरण्यास १९८०-८१ ला प्रारंभ केला. १९८८ ला स्वयंचलित लूम काढून फक्त एअरजेट लूम वापरण्यास सुरूवात केली. १९९१ मध्ये वायडिंग विभागात २ अँटो कोनर मशीन बसविले आहेत. अर्थात त्यामुळे कामगार संख्येत फार मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. असे मात्र दिसत नाही.

वरील कामगार संख्या ही स्पिनिंग, विव्हिंग, प्रोसेसिंग, इंजिन, जनरल अशा सर्व विभागातील मिळून आहे. विभागानुसार कामगार संख्या पाहण्यासाठी १) स्पिनिंग विभाग, २) विव्हिंग विभाग, ३) प्रोसेसिंग विभाग, ४) इंजिन विभाग असे विभाजन करणे इष्ट ठरेल. विभागानुसार कामगार संख्येत झालेला बदल पुढील प्रमाणे -

१.१०.२ विभागानुसार कामगार संख्या

१) स्पिनिंग विभागातील कामगार संख्येतील बदल

स्पिनिंग विभाग हा गिरणीतील सर्वात जुना विभाग आहे. डिसेंबर, १९८५ ते जुलै, १९९३ पर्यंत या विभागातील कामगार संख्येत झालेला बदल पुढील तक्त्यावरून लक्षात येतो.

तक्ता क्र.१.१२

| वर्ष | | कायम कामगार | बदली कामगार | शिकाऊ कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर | १९८५ | ५३५ | २२२ | ३ | ७६० |
| " | १९८६ | ५१० | २०३ | ४ | ७१७ |
| " | १९८७ | ४९५ | २०१ | ४७ | ७४३ |
| " | १९८८ | ४७२ | २३२ | -- | ७०४ |
| " | १९८९ | ४४४ | २२१ | -- | ६६५ |
| " | १९९० | ५०० | १३० | ५३ | ६८३ |
| " | १९९१ | ५०४ | १०७ | ८३ | ६९४ |
| " | १९९२ | ४५७ | १७५ | २ | ६३४ |
| जुलै | १९९३ | ४०९ | १७२ | २ | ५८३ |

माधवनगर कॉटन मिल लेबर ऑफिस

स्पिनिंग विभागातील कामगार संख्या १९८५ नंतर वाढलेली तर नाहीच उलट प्रत्येक वर्षी एकूण कामगार संख्येत घट होत असल्याचे दिसते. डिसेंबर १९८५ मध्ये एकूण कामगार संख्या ७६० होती. ती जुलै, १९९३ मध्ये ५८३ झाली आहे. म्हणजेच १७७ नी कामगार संख्या घटलेली आहे. कायम कामगार संख्येत ही घट झालेली आहे. १९८५ साली कायम कामगार संख्या ५३५

होती. ती जुलै, १९९३ मध्ये ४०९ पर्यंत खाली आली आहे. म्हणजेच जवळ जवळ १२५ नी कामगार संख्या घटली असल्याचे दिसते. बदली कामगार संख्येतही ५० कामगारांची घट झालेली आहे. शिकाऊ कामगार संख्येत काही वर्षे वाढ झाली आहे. मात्र जुलै, १९९३ रोजी पुन्हा ती पूर्वी इतकी म्हणजे १९८५ मधील संख्येसारखी घटली आहे.

तक्ता क्र.१.१३

(२) विव्हिंग विभागातील कामगार संख्येतील बदल -

| वर्ष | कायम कामगार | बदली कामगार | शिकाऊ कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|
| डिसें. १९८५ | २५७ | ४९ | २ | ३०८ |
| " १९८६ | २४५ | ४६ | २ | २९३ |
| " १९८७ | २३८ | ४४ | - | २८२ |
| " १९८८ | २३० | ४४ | ५ | २७९ |
| " १९८९ | २४५ | २८ | १ | २७४ |
| " १९९० | २४२ | ३२ | ७ | २८१ |
| " १९९१ | २३१ | ३२ | १ | २६४ |
| " १९९२ | १९० | ३२ | १ | २२३ |
| जुलै १९९३ | १८७ | ३१ | १ | २१९ |

माधवनगर कॉटन मिल लेबर ऑफिस

विव्हिंग विभागात एकूण कामगार संख्येत प्रत्येक वर्षी घट होत असल्याचे दिसते. डिसेंबर, १९८५ साली एकूण कामगार संख्या ३०८ होती. ती जुलै,

१९९३ मध्ये २१९ इतकी झाली असल्याने जवळ जवळ ९० नी कामगार संख्या घटली आहे. कायम कामगार संख्येत ही घट झालेली दिसते. डिसेंबर,१९८५ मध्ये कायम कामगार संख्या २५७ होती ती जुलै, १९९३ मध्ये १८७ झाली. असल्याने जवळ जवळ ७० नी कामगार संख्या घटली आहे. बदली कामगार संख्या सुध्दा कमी झालेली आहे. शिकाऊ कामगार संख्येत मात्र फारसा बदल दिसत नाही. १९८८ नंतर एअरजेट लूमचा वापर सुरु केल्याचा परिणाम म्हणून कायम कामगार आणि बदली कामगारांची संख्या कमी होत असावी.

तक्ता क्र.१.१४

(३) प्रोसेसिंग विभागातील कामगार संख्येतील बदल

| वर्ष | कायम कामगार | बदली कामगार | शिकाऊ कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|
| डिसें.,१९८५ | २५० | ९३ | - | ३४३ |
| " १९८६ | २६५ | ८१ | - | ३४६ |
| " १९८७ | २५५ | ८९ | २१ | ३६५ |
| " १९८८ | २८४ | ५१ | १८ | ३५३ |
| " १९८९ | २७९ | ६९ | ९ | ३५७ |
| " १९९० | ३०७ | ४४ | १६ | ३६७ |
| " १९९१ | ३०९ | ४६ | ३३ | ३८८ |
| " १९९२ | ३१० | ७६ | - | ३८६ |
| जुलै, १९९३ | २९८ | ७४ | - | ३७२ |

माधवनगर कॉटन मिल लेबर ऑफिस

१९८७ पूर्वी माधवनगर कॉटन मिलमधील प्रोसेसिंग विभागात फक्त प्रोसेसिंग, फोल्डिंग हे दोनच विभाग काम करीत होते असे कामगारांची कामानुसार विभागणी पाहिल्यानंतर लक्षात येते. १९८८ पासून स्वतंत्र प्रिंटींग विभाग सुरु झाल्याचे स्पष्ट होते. प्रोसेसिंग विभागातील एकूण कामगार संख्या अल्प प्रमाणात का होईना पण वाढत असल्याचे दिसते. डिसेंबर, १९८५ मध्ये कामगार संख्या ३४३ होती ती डिसेंबर, १९९२ मध्ये ३८६ झाली आहे. मात्र जुलै, १९९३ ला ती थोडी घटलेली म्हणजे ३७२ होती. कायम कामगार संख्येबाबतची तीच स्थिती दिसते. कामगार संख्या २५० वरून ३१० पर्यंत वाढत गेली आहे. मात्र जुलै, १९९३ ला ती २९८ झाल्याचे म्हणजेच १२नी घटल्याचे दिसते. या विभागातील बदली कामगार संख्येत चढउतार दिसतात. मात्र फारशी घट झालेली नाही. ती ९३ वरून ७४ पर्यंत घटली आहे. या विभागात १९८७ नंतर ३-४ वर्षे शिकावू कामगार होते. मात्र तेही सध्या नाहीत.

## (४) इंजिन विभागातील कामगार संख्येतील बदल :

मेकॅनिक, इलेक्ट्रीक, बॉयलर यांचा समावेश इंजिन विभागात केला आहे. या विभागात काम करणारे कामगार वरील स्पिनिंग, विव्हिंग, प्रोसेसिक या तिनही विभागाशी संबंधित असतात. या विभागातील कामगार संख्या -

तक्ता क्र. १.१५

| वर्ष | | कायम कामगार | बदली कामगार | शिकावू कामगार | एकूण कामगार |
|---|---|---|---|---|---|
| डिसें., | १९८५ | ६७ | ८ | - | ७५ |
| " | १९८६ | ६९ | ७ | २ | ७८ |
| " | १९८७ | ६७ | ७ | २ | ७६ |
| " | १९८८ | ६५ | १५ | १ | ८१ |
| " | १९८९ | ६५ | १५ | ३ | ८३ |
| " | १९९० | ६३ | १७ | ३ | ८३ |
| " | १९९१ | ६२ | २० | ३ | ८५ |
| " | १९९२ | ४८ | २२ | ३ | ७३ |
| जुलै | १९९३ | ४५ | २३ | ३ | ७१ |

माधवनगर कॉटन मिल लेबर ऑफिस

या विभागात एकूण कामगार संख्या डिसेंबर १९८५ पासून अल्पशी का होईना डिसेंबर १९९१ पर्यंत वाढत गेल्याचे दिसते. डिसेंबर, १९९२ आणि जुलै, १९९३ या दोन वर्षी मात्र कामगार संख्या घटलेली दिसते. कायम कामगार संख्येबाबतही १९९२, १९९३ या दोन वर्षी कामगार संख्येत घट झाल्याचे दिसते. मात्र बदली कामगार संख्या प्रथम पासून वाढत गेली आहे. तर शिकावू कामगार संख्येत फारसा बदल नाही. किंबहुना ती जवळ - जवळ स्थिर आहे.

## १.११ संशोधनाचा उद्देश :

भारतात स्वातंत्र्यप्राप्ती पुर्वी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक लघुउद्योग, मध्यम व मोठे उद्योग स्थापन झालेले आहेत. काही उद्योग सार्वजनिक क्षेत्रात,

काही खाजगी मालकीचे तर काही सहकारी तत्वावर स्थापन झालेले आहेत. अशा विविध उद्योगात श्रमिक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक उद्योगातील कामगारांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती भिन्न - भिन्न असते. त्याचा कामगाराच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कामगारांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रगत सांगली जिल्हयातील "माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर" या मिलची निवड केली आहे.

भारतात सर्वात जुना आणि संघटित उद्योग म्हणून कापड उद्योगाला महत्व प्राप्त होते. सुती आणि तलम कापडाबद्दल भारत प्रसिध्द होता. मात्र इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर भारत इंग्लंडची वसाहत झाल्याने इंग्लंडमधील कारखान्यात तयार झालेले कापड भारतात विक्रीस येऊ लागले. इंग्लंडमधील प्रगत कारखानदारीस तयार झालेले कापड मजबूत, आकर्षक आणि कमी किंमतीत मिळत होते. त्याचा प्रतिकूल परिणाम भारतीय कापड उद्योगावर झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने नियोजनाचा अवलंब करून कापड उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. कापड उद्योगात शेती खालोखाल रोजगार संधी उपलब्ध होत असल्याने त्याला महत्व प्राप्त झाले आहे.

एकूणच औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना एक यंत्र म्हणून मोठ्या प्रमाणावर राबविले जात असे. अनिश्चित कामाचे तास, अत्यल्प वेतन विश्रांतीच्या सुविधांचा अभाव, आजारपणात, अपघात झाल्यास आर्थिक मदतीचा अभाव, नोकरीची अनिश्चितता, बढतीच्या संधीचा अभाव यासारख्या संमस्यांमुळे कामगार नेहमी चिंताग्रस्त असे. आपण गुलाम आहोत, काम करतो त्या उद्योगाशी आपला जवळचा संबंध नाही ही भावना कामगारांच्यात रूजत

असे, सतत भविष्याच्या चिंतेत तो वावरत असे. या अडथळ्यातून कामगाराला बाहेर काढण्याच्या हेतूने केंव्हावेळी कायदे करण्यात आले आहेत, येत आहेत. कामगारांच्या कामाच्या परिस्थितीत १९४८ च्या कारखाना कायद्याने सुधारणा करण्यात आली आहे. तसेच कामगार विमा योजना, भविष्य निर्वाह निधी कायदा, ग्रॅज्युईटी कायदा, बोनस कायदा, नुकसान भरपाई कायदा असे विविध कायदे करुन सरकारने कामगारांच्या हीताची जपणूक करण्याच्या हेतूने निश्चित भूमिका स्वीकारली आहे.

सरकारने विविध कायदे केले तरी मालक वर्ग त्यांची अंमलबजावणी काटे-कोरपणे करीत नाही. अनेक पळवाटातून तो मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. वरील सर्व सुविधांचा लाभ माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांना मिळतो. का नाही ? कामगारांची आर्थिक स्थिती कशी आहे ? काम करण्याची जागा कशी आहे ? याचा अभ्यास करणेचे गरजेचे ठरते. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांचा सामाजिक - आर्थिक अभ्यास करताना पुढील उद्देश नजरे समोर ठेवलेले आहेत.

१) माधवनगर कॉटन मिल्स् लि. माधवनगर ची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भांडवल, उत्पादन व रोजगार विषयक स्थितीचा अभ्यास करणे.

२) माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या व्यक्तिगत माहितीचा अभ्यास करणे.

३) माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या कौटुंबिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांचे वेतन व उत्पन्न स्थितीचा अभ्यास करणे.

५) कामगारांच्या खर्चाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

६) कामगारांच्या व्यवसायिक परिस्थितीचा, व्यवसायिक सुविधांचा, कामगार संघाच्या कार्याबाबतचा अभ्यास करणे.

## १.१२ अभ्यासाची पध्दत :

सदरच्या संशोधनासाठी कामगारांची माहिती मिळविण्याच्या दृष्टीने मॅनेजर, लेबर ऑफिसर यांची भेट घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट केला. कामगारांबाबतची माहिती कामगारांकडून मिळविण्याबाबत आणि कामगारांचे वेतन, कपात, बोनस, गिरणीचे उत्पादन व इतर माहिती गिरणीतील त्या त्या विभागाकडून मिळविण्याबाबतची परवानगी घेतली. ही माहिती अन्य कायदेशीर कारवाईसाठी वापरली जाणार नाही याची मॅनेजर, लेबर ऑफिसर यांना कल्पना दिली आणि सहकार्य करण्याची विनंती केली. संशोधनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविण्यासाठी दोन पध्दतींचा अवलंब केला.

### १) प्राथमिक माहिती :

कामगारांची व्यक्तिगत माहिती, कौटुंबिक उत्पन्न, खर्च, व्यावसायिक परिस्थिती, व्यावसायिक सुविधा या सर्व बाबींचा अभ्यास करता येईल अशी मुलाखत पत्रिका मराठीतून संशोधन मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार तयार केली आणि कामगारांच्या मुलाखतीद्वारे माहिती मिळविली. सर्वच कामगाराच्या मुलाखती घेणे गैरसोयीचे असल्याने पुढील दोन पध्दतींचा अवलंब केला.

अ) <u>नमुना पध्दत</u> -

गिरणीमध्ये स्पिनिंग, विव्हिंग, प्रोसेसिंग या तीन विभागात उत्पादन कार्य चालत असले तरी गिरणीत एकूण १८ वेगवेगळ्या खात्यांमध्ये काम चालते. त्या सर्व खात्यातील कामगारांचा अभ्यासात समावेश करणे गरजेचे असल्याने सर्व खात्यांना सारखेच महत्त्व प्राप्त करण्याच्या हेतूने नमुना पध्दतीचा अवलंब केला. नमुना पध्दतीनुसार कामगारांची निवड केली. त्यानुसार प्रत्येक विभागात १ ते ५० या मर्यादेत कामगार संख्या असेल तर १ कामगार, त्यापेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० पर्यंत कामगार असतील तर २ कामगार याप्रमाणे एकूण कामगारांतून विशिष्ट कामगार संख्या निश्चित करण्याचे ठरविले.

नमुना पध्दतीनुसार कामगार संख्या निश्चित करण्यासाठी ३१ जुलै, १९९३ या विशिष्ट महिन्यातील खात्यानुसार कायम कामगारांची माहिती मिळविली आणि त्यातून कामगारांची निवड केली.

तक्ता क्र. १.१६

विभागानुसार ३१ जुलै १९९३ अखेर मस्टरवरील कामगार

| अ.नं. | खाते | कायम कामगार | अभ्यासासाठी नियुक्त कामगार संख्या |
|---|---|---|---|
| १ | ब्लोरूम | ३३ | १ |
| २ | कार्डींग | ४० | १ |
| ३ | कोंबर | ६ | १ |
| ४ | स्पिडफ्रेम | ७४ | २ |
| ५ | रिंगफ्रेम | २५१ | ५ |
| ६ | डबलींग | ५ | १ |
| ७ | वायडींग | १६७ | ४ |
| ८ | कोन कांडी-पॅकींग | ४ | १ |
| ९ | वार्पिंग | १६ | १ |
| १० | सायझिंग | ९ | १ |
| ११ | विव्हिंग | १६२ | ४ |
| १२ | मेकॅनिक | २२ | १ |
| १३ | इलेक्ट्रीक | ३ | १ |
| १४ | बॉयलर | २० | १ |
| १५ | प्रोसेसिंग | १९९ | ४ |
| १६ | फोल्डींग | ६२ | २ |
| १७ | प्रिंन्टींग | ३७ | १ |
| १८ | जनरल | २३ | १ |
| | एकूण .. | ११३२ | ३३ |

ब) लॉटरी पध्दत -

गिरणीमध्ये असलेल्या वेगवेगळ्या १८ खात्यातील कामगार अभ्यासासाठी नियुक्त करण्यासाठी कामगार संख्या नमुना पध्दतीने निश्चित केली. मात्र नमुना पध्दतीनुसार निश्चित केलेल्या कामगार संख्येइतक्या कामगारांची मुलाखत घेताना पूर्वग्रह दूषीत पणा असू नये, योग्य माहिती मिळविता यावी, जास्तीत जास्त अचूक माहिती मिळविता यावी यासाठी खातेनिहाय कामगारांच्या नावाच्या चिठ्ठया तयार केल्या. त्यातून निश्चित केलेल्या संख्येइतक्या चिठ्ठया उचलून म्हणजेच लॉटरी पध्दतीचा अवलंब करून कामगाराचे नांव निश्चित केले.

प्रत्यक्ष मुलाखत -

लॉटरी पध्दतीचा अवलंब करून निश्चित केलेल्या कामगारांना प्रत्यक्ष भेटून कामगारांना सहकार्याची विनंती केली. मराठी भाषेतून तयार केलेली मुलाखत पत्रिका भरून घेण्याअगोदर कामगारांना सदर संशोधनाचा उद्देश स्पष्ट करून सांगितला. कामगारांच्या मनात असलेली भिती, गैरसमज अगोदर पूर्णपणे दूर केले. त्यांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण केले. आपण जितकी खरी माहिती सांगू तितके अधिक अचूक निष्कर्ष काढता येतील याची जाणीव कामगारांना करून दिली आणि कामगारांकडून अधिकाधिक विश्वासार्ह माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

सदर गिरणीत बदली कामगारांची एकूण संख्या ३८२ आहे. त्यांच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकता यावा म्हणून १० कामगारांची मुलाखत पत्रिका भरून घेतली.

२) दुय्यम माहिती :

सदर संशोधनासाठी कामगारांची मुलाखत घेण्यास प्रश्नावली तयार

तयार करण्यासाठी वेगवेगळी पुस्तके, मासिके, नियतकालिके, संबंधित प्रबंध या दुय्यम पुराव्यांचा वापर केला. मिलचे उत्पादन, भांडवल, रोजगार या संबंधिची माहिती मिळविण्यासाठी मिलचा अहवाल, लेबर ऑफिस व टाईम विभागाकडून आवश्यक माहितीचे दुय्यम पुरावे मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच वेळोवेळी इतर पदाधिकारी, तज्ज्ञ अभ्यासकाची मते इ. चाही दुय्यम पुरावा म्हणून उपयोग केला. सदर अभ्यासाची विभागणी -

१) माधवनगर कॉटन मिल्सचा ऐतिहासिक आणि सद्य:स्थितीचा अभ्यास.

२) माधवनगर कॉटन मिल्समधील कामगारांच्या वैयक्तिक माहितीचा अभ्यास.

३) माधवनगर कॉटन मिल्समधील कामगारांचा कौटुंबिक अभ्यास.

४) सदर मिलमधील कामगारांच्या वेतन व उत्पन्नाचा अभ्यास.

५) सदर मिलमधील कामगारांच्या खर्च आणि बचतीबाबतचा अभ्यास.

६) सदर मिलमधील औद्योगिक संबंध व कामाच्या स्थितीबाबतचा अभ्यास.

७) सदर मिलमधील कामगारांची सामाजिक - आर्थिक व कामगार विषयक परिस्थिती सुधारण्यासाठी काढण्यात आलेले निष्कर्ष व उपाय.

अभ्यासाच्या मर्यादा :

१) नमुना पध्दतीने निवडलेल्या कामगारांच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे प्रश्नावलीच्या साहाय्याने काढलेले निष्कर्ष जास्तीत जास्त परिपूर्ण व अचूक काढण्याचा प्रयत्न केलेला असला तरी कामगारांच्या प्रतिसादाच्या बाबतीत आणि निश्चित व अचूक आकडेवारीच्या संदर्भात काही उणिवा राहण्याची शक्यता आहे. तरी परंतु

प्रतिसादाच्या व आकडेवारीच्या बाबतीत जास्तीत जास्त अचूकता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

२) माधवनगर कॉटन मिल ही आजारी मिल म्हणून घोषित केल्याने त्या मिल्सच्या संदर्भात असलेले व्यवस्थापन, भांडवल, कर्ज, उत्पादन व विक्री या संदर्भात काढलेले निष्कर्ष सर्वच कापड गिरण्यांना लागू पडतीलच असे मात्र नाही.

३) या मिल्समधील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थिती विषयी काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य प्रवृत्ती दर्शक असले तरी ते सर्वच कापड गिरणीतील कामगारांच्या बाबतीत जसेच्या तसे लागू पडतीलच असे नाही. मात्र या अभ्यासावरुन माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या सामाजिक - आर्थिक परिस्थिती विषयी कल्पना येऊ शकते.

.......